# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०९/१०/२०२२ (रविवार)**

**(दुपार)**

---

### जबर दुखापत

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा सावरमेंढा सावनेर येथे दिनांक ०४/१०/२०२२ ते २१.३० वा. सुमारास आरोपी क्र. १. नितीन प्रल्हाद शेंडे व २. शुभम नितीन शेंडे, दोन्ही रा. सावरमेंढा ता. सावनेर व फिर्यादी नामे– मनोज श्यामराव शेंडे वय ४२ वर्ष, रा. सावरमेंढा ता. सावनेर हे एकाच गावातील राहणारे असुन यातील आरोपी क्र १ हा नेहमी फिर्यादीला टोमणे मारत असतो. नमूद घ.ता.वेळी व ठिकाणी गावातील शेषराव केणे याच्या घरी महानुभवपंथ निमित्त जेवणाचा कार्यक्रम असल्याने फिर्यादी व आरोपी लोक सुध्दा जेवण्याचा कार्यक्रमला आले होते. त्या ठिकानी यातील आरोपी क्र. १ याने फिर्यादीला विनाकारण मजाकबाजी टिंगल करीत असता दोघांचा तोंडा तोंडी वादविवाद झाली व फिर्यादीने आरोपी क्र. १ ला हटकले असता आरोपी क्र २ याने हातात लाकडी काडी घेवुन फिर्यादीच्या उजव्या हातावर मारले फिर्यादीने आज दि ०८/१०/२०२२ रोजी माराबाबतचे वैद्यकिय कागदपत्र सादर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास जिपोउपनि इस्माइल शेख मो क्र ९४२३६०३१७५ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ३० कि. मीं अंतरावरील मौजा उटी शिवार येथे दिनांक ०६/१०/२२ चे १९.३० वा. सुमारास एम.एच– ३१/सि.पी– ९३०१ क्रमांकाची स्कार्पिओ चा चालक आरोपी नामे– विक्की उर्फ मुकेश कठोते, रा. बिरसा नगर, ता. उमरेड याने त्याच्या ताब्यातील स्कार्पिओ कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन उमरेडच्या दिशेने जाणाऱ्या एम.एच– ३१/सि.पी– ४६१३ क्रमांकाच्या ट्रॅक्टरला मागुन धडक दिली. या अपघातात ट्रॅक्टरचा मागील डाला उसळुन स्कार्पिओवर आदळला त्या अपघातामध्ये स्कार्पिओ चालक विक्की उर्फ मुकेश कठौते, रा. बिरसा नगर, ता. उमरेड स्वत:चे मरणास तर ट्रक्टर मध्ये बसलेले प्रतिभा विक्की कठोते, अभिषेक मोहन कठोते, सर्व रा. बिरसा नगर, कुही यांचे जखमी होण्यास तसेच अनिता रौतेला, रा. कुही फाटा, बिरसा नगर हिच्या मरणास कारणीभुत झाल्याचे चौकशी अहवाल वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार विजय कुमरे, पो.स्टे. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक चंद्रकांत मदने, मो.नं. ९९२२४३६१९५ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. जलालखेडा :—** दिनांक ०८/१०/२०११ चे ०७.०० वा. ते ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय १७ वर्ष हिचे आरोपी क्र. १. मारोती लक्ष्मण बोटरे रा. अंबाडा सायवाडा याचे सोबत ०६ महिण्यापासुन बोलचालीचे संबध होते. तेव्हा पासुन आरोपी क्र. १. हा फिर्यादीला नेहमी तिची ईच्छा नसतांनाही 'तुझ्या सोबत लग्न करतो' असे म्हणुन त्रास देत होतो व पाठलाग करीत होता. फिर्यादी ही तीचे आई व वडील यांचे सोबत तिचे चुलत भाऊ याचे घरी बसले असता आरोपी क्र. १. हा तेथे आला व फिर्यादिस म्हणाला की, ' तुझ्या घराचे बाजुला राहणारा मुलगा याचे सोबत तु आज का बोल्ली, तु कोणासोबत बोलायचे नाही तु फक्त माझीच आहे' असे म्हटले वरून फिर्यादी हीने म्हटले की, मी तुझ्या सोबत लग्न करीत नाही व त्याचे सोबत बोलली असे तुला कोणी सांगीतले, असे म्हटले असता फिर्यादीचे मावस भाऊ यास आरोपी क्र. २. राजकुमार बासकवरे, वय २९ वर्ष रा. अंबाडा सायवाडा, त. नरखेड जि. नागपूर याने फिर्यादीला सांगीतले असे आरोपी क्र. १. मारोती बोटरे म्हणत होता. त्यावेळी फिर्यादीचा चुलत भाऊ हा आरोपी क्र. २. राजकुमार बासकवरे याचे घरी विचारना करण्यास गेला असता राजकुमार बासकवरे व मारोती बोटरे या दोघांनी फिर्यादीचे चुलत भावाला शिवीगाळ करून ओढताण केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (ड), ३२३, ५०४,३४ भादंवी. सहकलम १२ बाल लैंगीक अपराधा पासुन सरंक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्री. मनोज चौधरी मो.क्र. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

**पो.स्टे. रामटेक :—** अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील शितलवाडी रामटेक येथे दिनांक ०५/१०/२०२२ चे १३.३० वा. ते १४.०० वा. सुमारास मर्ग क्र. ५७/२०२२ कलम १७४ जा.फौ. मधील मृतक नामे— प्रिती नितीन जिभकाटे, वय २२ वर्षे, रा. शितलवाडी रामटेक हिने आरोपी १) नितीन माधवराव जिपकाटे वय ३२ वर्षे, २) अल्का माधवराव जभकाडे वय ५३ वर्षे दोन्ही रा. शितलवाडी रामटेक यांचे त्रासाला कंटाळुन बोरिक पावडर किंवा इतर काहीतरी विषारी औषध प्राषण करण्यास जिव देन्यास प्रवृत्त केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अनुरंजन शालीकराम नागवंशी, वय ३२ वर्ष, रा. गल्ली नं. ७ फुटाळा अमरावती रोड नागपुर यांचे रिपोर्ट वरुन व मर्गच्या तपासात आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपी विरुध्द कलम ३०६, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपी क्र. १ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय खोब्रागडे मो.नं. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**